# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**शुक्रवार, दिनांक ५ एप्रिल, २०१३**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

| | | |
|---|---|---|
| **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | : | **"उल्हासनगर (जि.ठाणे) येथील टेस्ट ट्यूब बेबी सेंटरच्या संचालिकेने असंख्य महिलांची लाखो रुपयांची केलेली फसवणूक"** या विषयावरील श्री.पी.यु.महेता व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ९१४८० ला दिनांक १७ जुलै, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | |
|---|---|---|
| **जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून)** | : | मा.राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन २०१३-२०१४ चे वार्षिक नियोजन आणि वर्ष २०१२-२०१३ मधील वितरित तरतूद व माहे जानेवारी, २०१३ अखेर खर्चाचा जिल्हानिहाय तपशिलाबाबतचा अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री शिरीषकुमार कोतवाल,** हनुमंत डोळस, भारत भालके, प्रशांत बंब, जयकुमार गोरे, ॲड.उत्तमराव ढिकले, सर्वश्री वसंत गिते, दिलीप सोपल, अनिल गोटे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"वसंतदादा पाटील सहकारी साखर कारखाना विठेवाडी (लो) ता.देवळा, जि.नाशिकचे संचालक मंडळाने १७ मेगॅवॅट सहवीज निर्मिती प्रकल्प व मशिनरी आधुनिकीकरणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करून कारखाना कर्जाच्या खाईत लोटला असून कारखान्याची शेतकरी देणी, शासकीय देणी, वित्तीय संस्था देणी, कामगार देणी, इतर वैधानिक देणी इत्यादी एकूण अंदाजे २१८४२.८३ लाख रू. देणी असताना कारखान्याचे ११ संचालक, कार्यकारी संचालक व मुख्य लेखापाल यांनी संगनमताने राजीनामे देऊन कारखान्याचा दैनंदिन व्यवहार, कर्मचारी व शेतकऱ्यांना अडचणीत आणणे, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कर्मचाऱ्यांनी कर्जापोटी कपात केलेली रक्कम पतसंस्थेत न भरता कारखान्याच्या प्रशासनाने परस्पर खर्च करणे, गेल्या बारा महिन्यांपासून कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली ग्रॅज्युएटी भविष्यनिर्वाह निधी, विमा रक्कम न भरणे, शेतकऱ्यांचा ऊस शिल्लक असताना कारखाना लवकर बंद करणे, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा ऊस खाजगी कारखान्यांना द्यावा लागणे, या सर्वांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन त्यांच्यात प्रचंड असंतोष निर्माण होणे, या निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीबाबत मार्ग काढण्यासाठी व शेतकरी, सभासद, कर्मचारी यांना न्याय देऊन कारखाना वाचवण्यासाठी शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री वैजनाथ शिंदे,** राहुल बोंद्रे, दिलीपकुमार सानंदा, विजय खडसे, ॲड.यशोमती ठाकूर, श्री.बाबासाहेब पाटील, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मा. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"लातूर जिल्ह्यातील शहराबाहेरील वळणरस्ता दक्षिण (राजीव गांधी चौकी ते नांदेड नाका चौक) कि.मी. ४७८:३०० या रस्त्यांच्या कामासाठी २२.८१ कोटी रुपयांची अंदाजपत्रकात तरतूद असताना ३३.९८ कोटी रुपये खर्च करण्यात येणे, पाथर्डी-पाडळसिंगी-लोखंडी-सावरगांव लातूर, राष्ट्रीय महामार्ग १४४ कि.मी. १९०/८०० ते २०५/४०० करण्यात आला असणे, पाथर्डी-पाडळसिंगी-लोखंडी-सावरगांव लातूर, राष्ट्रीय महामार्ग १४४ कि.मी. १७६/०० ते १९०/८०० या रस्त्याची दुरूस्ती करण्यासाठी २६.३७ कोटी रुपयांची तरतूद असताना ३१.९० कोटी रुपये खर्च करण्यात येणे, तसेच लातूर जिल्ह्यातील चिकलढाणा-भावखेडा रस्त्यावरील मांजरा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्यासाठी ६.८५ कोटी रुपये खर्च करण्यात येऊनही गत तीन वर्षापासून पुलाचे काम अपूर्ण असणे, उपरोक्त रस्त्यांच्या कामासाठी वाढीव खर्चास नियमानुसार मंजुरी घेणे आवश्यक असतानाही मंजुरी न घेता व निविदा न काढता संबंधित अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमत करुन वाढीव खर्च मंजूर करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणे, त्याचप्रमाणे मांजरा नदी व रेणा नदीवरील पुलासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात

येऊनही या पुलाचे काम गत ३ ते ४ वर्षापासून सुरु असून अद्याप अपूर्ण असणे, या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्याबाबत मा.मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागाकडे निवेदन देऊनही अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मार्च, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू रस्त्यांच्या कामासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येऊनही रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असून काही कालावधीतच सदरहू रस्ते अतिशय खराब होऊन वाहतुकीस धोकादायक झाले असल्याचे आढळून येणे, यामुळे ग्रामस्थ, वाहनधारक व चालक यांच्यात निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब सदरहू रस्त्यांच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची व निकृष्ट कामांची चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांचेवर कठोर कारवाई करण्याची तसेच सदर पुलाचे काम त्वरित पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री कृषिभूषण साहेबराव पाटील**, चंद्रशेखर घुले, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"जळगाव जिल्ह्यातील संपूर्ण तापी खोऱ्यासाठी वरदान ठरणारा अवर्षण प्रवण क्षेत्रातील (D.P.A.P.) अंतर्गत असलेला निम्न तापी प्रकल्प, पाडळसे या प्रकल्पाचे सर्वेक्षण सन १९६६ साली होणे, माहे मार्च १९९७ मध्ये १४२.६४ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळणे, सन १९९८-९९ मध्ये रू.६.४५ लक्ष एवढा तुटपुंजा निधी देऊन प्रत्यक्ष कामास सुरूवात करणे, निधीअभावी काम प्रलंबित असणे, प्रशासकीय मान्यतेनुसार पाणी १७.८५ अब्ज घन फूट असणे, परंतु नंतर टप्पा-१ हा १०.४० अब्ज घन फूट व टप्पा -२ तयार करणे, केंद्रीय जलआयोग, पर्यावरण व वन विभागाची प्रकल्पास अद्यापही अंतिम मान्यता न मिळणे, निधीअभावी १५ वर्षांपासून एकाही गावाचे पुनर्वसनाचे काम पूर्ण न होणे, महाजनको दोंडाईचा जि.धुळे येथील प्रस्तावित (५ X ६६० मे.वॅ.) औष्णिक वीज प्रकल्प उभारण्याकरीता लागणाऱ्या ८५.०० दशलक्ष घन मीटर पाण्यासाठी मिळणारा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न न होणे, सिंचनासाठी पाणी वितरणप्रणाली (उपसा सिंचन योजना) करण्याबाबत कुठलीही कार्यवाही न होणे, तापी खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न असलेल्या प्रकल्पाच्या टप्पा - २ ला मंजुरी व निधी न मिळणे, यामुळे तापी खोऱ्यात नागरिकांमध्ये प्रचंड प्रमाणात शासनाप्रती वाढलेला असंतोष, यामुळे जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असणे, लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता निम्न तापी प्रकल्पाच्या टप्पा २ व ८ उपसा सिंचन योजनेच्या कामाला तातडीने मंजुरी देऊन प्रकल्पाच्या कामास निधी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**सात : शासकीय विधेयके :-**

**पुरःस्थापनार्थ -**

(१) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३.

(२) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३.

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**आठ : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुरःस्थापनार्थ :-**

**(१)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक २८ - महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१२ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(२)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३० - महाराष्ट्र टोल (वसूलीचे विनियमन) विधेयक, २०१२ - **सर्वश्री एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक, राजन विचारे, वि.स.स. यांचे.**

**(३)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१२ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(४)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - महाराष्ट्र विशेष न्यायालये विधेयक, २०१२ - **सर्वश्री सुभाष देसाई, एकनाथ शिंदे, वि.स.स. यांचे.**

**(५)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (सुधारणा) विधेयक, २०१२ **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**(६)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र पोलीस विधेयक, २०१२ - **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचे.**

**(७)** सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - भारतीय दंड संहीता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१२ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(८)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ५ - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(९)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ६ - हिंदू वारसा (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(१०)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ७ - फौजदारी प्रक्रिया संहिता, (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचे.**

**(११)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ८ - फौजदारी प्रक्रिया संहिता, (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३- **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(ब) विचारार्थ :- (बॅलटमधील प्राथम्य क्रमानुसार)**

**(गतसत्रातील शुक्रवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजीच्या विधानसभेच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली तथा पुढे ढकलण्यात आलेली अशासकीय विधेयके.)**

**(१)** सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र प्रोत्साहनाद्वारे कुटुंब नियोजनास चालना देण्याबाबत विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**(२)** सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - महाराष्ट्र राज्य सेवा हमी विधेयक, २०११ **सर्वश्री देवेंद्र फडणवीस, एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स. यांचे.**

**(३)** सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ७१ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**(४)** सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १७ - शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ४ एप्रिल, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.